**सारथी मुख्यालयात पुरवठा करावयाच्या भाडे तत्वावरील वाहनाच्या निविदे संदर्भातील दिनांक १८ मे २०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता झालेली प्रि बिड मिटिंग**

उपरोक्त बैठकीस वाहन पुरवठादार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते सोबत उपस्थितांची यादी जोडली आहे.

पुरवठादाराने विचारलेले प्रश्न व त्याचा खुलासा खालीलप्रमाणे

| अ. क्रं | निविदेतील खंड/अटी व शर्ती / Clause/Term Condition | उपस्थित करण्यात आलेला प्रश्न | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | १.१ On line Banking System द्वारे रक्कम भरणा करणेबाबत | बयाणा रक्कम व निविदा खरेदी रक्कम DD/Cash/ Check स्वरुपात खरेदी करता येईल का ? | सर्व रक्कम या Online Net Banking System द्वारे सारथीच्या Acconuts वर भरावी. निविदा रक्कम GST सह असेल |
| २. | २.२ निविदा अर्ज | निविदा खरेदी करताना अर्ज कसा करायचा ? | कंपनीच्या Letter Head वर प्रपत्र-१ मधील मजकूर लिहून /टाईप करुन तो अर्ज upload करावा व निविदा खरेदी करावी. |
| ३. | २.२ मधील(३)<br>RTO कडील टुरीस्ट परवाना | RTO कडील टुरिस्ट परवाना आवश्यक आहे का ? | RTO कडील टुरिस्ट परवाना आवश्यक असून मोटार ट्रान्सपोर्ट वर्क ॲक्ट १९६१ नुसार वाहनासाठी लागू असणारे सर्व नियम, अटी व शर्ती लागू राहतील |
| ४. | आयकर प्रमाण पत्र २.२ (e)मधील (e) | सन २०२३-२४<br>सन २०२४-२५<br>सन २०२५-२६ या वर्षातील आयकर विवरण पत्र दाखल करणेबाबत | मागील तीन वर्षाचे ITR भरलेले त्यावर सनदी लेखापालाची स्वाक्षरी व मोहोर घेऊन सादर करावीत व upload करावीत . सन २०२५-२६ चे आयकर विवरण पत्र नसल्यास सन २०२२-२३ सन २०२३-२४ सन २०२४-२५या वर्षातील आयकर विवरण पत्र दाखल करावे. |
| ५. | २.३ निविदेचे मुल्यमापन | तांत्रिक लिफाफा परिपूर्ण नसेल पंरतू भरण्यात आलेले दर कमी असतील तर व्यापारी निविदा उघडली जाते का ? | तांत्रिक लिफाफ्या मधील निविदेत नमुद केलेली कागदपत्रे कमी असतील तर अशा वेळी व्यापारी लिफाफा उघडला जात नाही. संबधित पुरवठादाराची अशी निविदा रद्द होते |
| ६. | २.४(१४) सारथीचे कार्यक्षेत्र | पुरवठा करण्यात आलेल्या वाहनाचे कार्यक्षेत्र कुठ पर्यत असेल? परगावी मुक्काम झाल्यास ड्रायव्हरांना वेगळा भत्ता दिला जाईल का? व टोलची रक्कम सारथी वेगळयाने देईल का ? | पुरवठा करण्यात आलेल्या वाहनाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र असून आवश्यक असल्यास सारथीच्या आठ विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात दौरे करावयाचे असल्यास अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या समवेत सदरील वाहन त्या ठिकाणी घेऊन जावे लागेल. प्रवासा दरम्यान टोल लागल्यास वाहन पुरवठादाराने तो स्वत: भरावयाचा आहे. त्यासाठी सारथी कडून प्रतिपूर्ती होणार नाही. तसेच दौऱ्या दरम्यान रात्रीचा मुक्काम झाल्यास वाहन चालकास वेगळा भत्ता अदा केला जाणार नाही. |

| अ. क्रं | निविदेतील खंड/अटी व शर्ती / Clause/Term Condition | उपस्थित करण्यात आलेला प्रश्न | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ७. | दरवाढ | डिझेल/पेट्रोल/CNG किंवा वाहनाच्या Spare Parts च्या दरामध्ये वाढ झाल्यास कार्यादेशामधील रक्कम वाढवून मिळेल का? | डिझेल/पेट्रोल/CNG किंवा वाहनाच्या Spare Parts च्या दरामध्ये वाढ झाल्यास अथवा ड्राइव्हरचा पगारवाढ झाल्यास कार्यादेशात नमूद करण्यात आलेल्या दरामध्ये कुठलीही दरवाढ दिली जाणार नाही |
| ८. | वित्तीय निविदा प्रपत्र -६ | निविदेत दर भरताना -GST वगळून दर भरावयाचे का ? | निविदेमध्ये ज्या ठिकाणी दर भरावयाचे आहेत त्याठिकाणी Excluding GST असे स्पष्ट नमूद केले आहे. नियमानुसार वेगळा GST अदा केला जाईल. दर भरताना २००० किमी साठी एकत्रित दर,तसेच २००० किमी पेक्षा वाहन जास्त धावल्यास **प्रति किमी** दर नमुद करावा. तसेच मुख्यालयास/प्रस्तावति ठिकाणी पोहोंचण्यास १२ तासापेक्षा जास्त कालावधी लागल्यास प्रति तास नमुद करावा. निविदाधारकाने भरलेल्या दरासोबत तुलना करताना २००० किमीच्या दरासाठी भरलेल्या दराशी तुलना केली जाईल, त्यानुसार L१,L२,L३ निवडले जातील. |

या बैठकीदरम्यान निविदेतील सर्व अटी, शर्ती व नमुद बाबी पुरवठादारांना समजावून सांगण्यात आल्या, उपस्थित पुरवठादारांना काहीही प्रश्न उपस्थित करावयाचे नसल्यामुळे पूर्व निविदा बैठक सर्वांचे आभार मानून संपल्याचे जाहीर करण्यात आले.

19/05/2026

(अभय पालवणकर)
कार्यकारी अधिकारी
स्थावर विभाग

19/05/26.

(विकास खामकर)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी

Signature Not Verified
Digitally signed by KISHOR SHANKAR DHOKARE
Date: 2026.05.19 19:45:58 IST
Location: Maharashtra-MH